**ठळक बातम्या**

- संसदेचं पावसाळी अधिवेशन येत्या सोमवारपासून/ केंद्र सरकारनं बोलावली उद्या सर्वपक्षीय बैठक

- गणेशोत्सवानिमित्त पश्चिम रेल्वेच्या कोकणासाठी विशेष गाड्या

- पहलगाम हल्ल्याचा चीनकडून निषेध/ दहशतवादाविरोधात एकजुटीचं इतर देशांना आवाहन

**आणि**

- फिडे बुद्धिबळ महिला विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत चार भारतीय खेळाडू दाखल

**<><><><>**

संसदेचं पावसाळी अधिवेशन येत्या सोमवारी २१ जुलैपासून सुरू होत आहे. ते येत्या २१ ऑगस्टपर्यंत चालेल. या अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनं उद्या दिल्लीत सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. अधिवेशनात दोन्ही सभागृहांचं कामकाज सुरळीत व्हावं याकरता सरकार या बैठकीत सर्व पक्षांना सहकार्याचं आवाहन करेल. या पावसाळी अधिवेशनात अनेक महत्त्वपूर्ण विधेयकांवर चर्चा होईल.

**<><><><>**

विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी तंत्रज्ञानाचा पाया भक्कम करायचं काम वेगाने सुरू आहे, असं प्रतिपादन माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज केलं. हैदराबादच्या भारतीय तंत्रज्ञान संस्थेच्या पदवीदान सोहळ्यात ते बोलत होते. देशाच्या तंत्रज्ञानाधारित भविष्याकडे लक्ष वेधून त्यांनी विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचं तंत्रज्ञान आणि उत्पादनं तयार करण्याचं आवाहन केलं. सेमीकंडक्टर क्षेत्रात सुरू असलेल्या कामाबद्दल ते म्हणाले,

***होल्ड… बाईट- अश्विनी वैष्णव (२४ सेकंद)***

**<><><><>**

२०४७ सालापर्यंत विकसित देश बनण्याचं भारताचं ध्येय असून, ते साध्य करण्यामध्ये प्रत्येक नागरिकाची भूमिका महत्त्वाची आहे असं केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र

प्रधान यांनी म्हटलं आहे. ते केरळमध्ये आयआयटी पलक्कड च्या ७ व्या दीक्षांत समारंभात बोलत होते. विद्यार्थ्यांनी वाहतूक, गृहनिर्माण, वैद्यकीय सुविधा आणि शेतीसह विविध क्षेत्रांमध्ये जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांच्या उभारणीत पुढाकार घ्यावा, असं आवाहन त्यांनी यावेळी केलं. जागतिक डिजिटल विश्वात भारताचं वाढतं अस्तित्व लक्षात घेता, देशभरात समावेशक आणि नैतिक डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा उभारण्याचा सरकारचा दृष्टिकोन असल्याचं त्यांनी सांगितलं.

आयआयटी पलक्कड विकसित भारताच्या उद्दिष्टामध्ये योगदान देण्यासाठी वचनबद्ध असून, त्या दिशेने प्रवास करत असल्याचं ते यावेळी म्हणाले.

<><><><>

जी-ट्वेंटी देशांचे अर्थमंत्री आणि मध्यवर्ती बँकाच्या गव्हर्नरांची दोन दिवसीय बैठक दक्षिण आफ्रिकेत डर्बन इथं काल संपली. या बैठकीत संघर्ष, व्यापार तणाव, पुरवठा साखळीतले अडथळे, कर्ज आणि हवामानाशी निगडीत आपत्तींसह प्रमुख जागतिक आव्हानांवर चर्चा झाली. विद्यमान आणि भविष्यातल्या आव्हानांना तोंड देण्यासाठी एकजुटीनं काम करण्यावर सदस्य देश वचनबद्ध असल्याचं बैठकीनंतर प्रसिद्ध केलेल्या जाहीरनाम्यात म्हटलं आहे.

<><><><>

सिक्किममधल्या नथुला पास मार्गाने कैलास मानसरोवर यात्रा सुरळीतपणे सुरु आहे. यात्रेकरूंच्या सहाव्या तुकडीला आज यात्रा व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी रवाना केलं. नथुला मार्गाने आणखी चार तुकड्या मानसरोवर यात्रेसाठी जातील. सर्व जथ्यांबरोबर डॉक्टर, खानसामे आणि संपर्क अधिकारी देखील असतील. देशाच्या विविध भागांमधून आलेल्या यात्रेकरूंना सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी भारतीय लष्कर, आयटीबीपी, सीमा रस्ते संघटना, बीएसएनएल, सिक्किम सरकार आणि इतर संस्था अथक परिश्रम घेत आहेत.

<><><><>

बेटींग ॲपच्या विविध प्रकरणांमधे गुगल आणि मेटा कंपन्यांना सक्तवसुली संचालनालयाने नोटीस जारी केली आहे. या कंपन्यांच्या प्रतिनिधींनी येत्या सोमवारी ईडीच्या दिल्ली कार्यालयात चौकशीसाठी हजर रहावं असं या नोटीशीत सांगितलं आहे.

बेटींग ॲपच्या प्रसारात या दोन डिजिटल मंचांची भूमिका काय? याचा तपास संचालनालय करीत आहे.

**<><><><>**

चीननं पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला असून प्रादेशिक सुरक्षा मजबूत करण्याच्या हेतूनं सर्व देशांनी दहशतवाद विरोधातली एकजूट बळकट करण्याचं आवाहन केलं आहे. लष्कर ए तैय्यबा या दहशतवादी संघटनेचा गट रेझिस्टन्स फ्रंट पहलगाम हल्ल्यामागे होता, या गटाला अमेरिकेनं दहशतवादी संघटना घोषित केल्याच्या पार्श्वभूमीवर चीननं ही प्रतिक्रिया दिली आहे. पाकिस्तानमधले लष्कर ए तैय्यबा, जैश-ए-मोहम्मद, जमात उद दावा हे दहशतवादी गट आणि हाफीज सईद, मसूद अझर या दहशतवादी कारवाया करणाऱ्या व्यक्तींचा संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेनं निर्बंध नियमांतर्गत समावेश केला आहे.

**<><><><>**

गणेशोत्सवानिमित्त प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन रेल्वेनं येत्या २२ ते २७ ऑगस्ट दरम्यान जादा गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे. मध्य रेल्वेच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस पासून रत्नागिरी, सावंतवाडी आणि मडगावपर्यंत तसंच पुणे स्थानकापासून रत्नागिरीपर्यंत गाड्या प्रवास करतील. दिवा ते चिपळूण पूर्णपणे अनारक्षित गाडी २३ ऑगस्टला धावेल.

पश्चिम रेल्वेच्या मुंबई सेंट्रल पासून ठोकुर आणि सावंतवाडीपर्यंत वांद्रे ते रत्नागिरी, बडोदा तसंच विश्वामित्री ते रत्नागिरी अशा विशेष गाड्या धावतील. पश्चिम रेल्वेच्या गाड्यांचं आरक्षण येत्या २३ जुलै पासून उपलब्ध होणार असल्याची माहिती रेल्वेनं एक्स प्रसार माध्यमातून दिली आहे.

**<><><><>**

सातव्या वेतन आयोगातील वेतनत्रुटी आणि कंत्राटी भरतीच्या निषेधार्थ राज्य परिचारिका संघटनेचं राज्यव्यापी आंदोलन सुरूच आहे. मागण्या पूर्ण होईपर्यंत अनिश्चित काळासाठी हा संप सुरू राहणार असल्याचं संघटनेनं सांगितलं आहे. पुण्यातल्या ससून रुग्णालयासह राज्यातल्या अन्य रुग्णालयांमधल्या परिचारिका संपावर गेल्यामुळे रुग्णसेवेवर परिणाम झाला आहे.

<><><><>

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी हिंगोली इथल्या सखी वन स्टॉप सेंटरला भेट दिली. पीडित महिलांनी आणि विद्यार्थिनींनी या मदत केंद्राची मदत घेऊन आपले प्रश्न सोडवावेत असं आवाहन यावेळी चाकणकर यांनी केले. यावेळी जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक आणि इतर अधिकारी - कर्मचारी उपस्थित होते.

<><><><>

राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियान स्पर्धा राबविली जाते. या अभियानांतर्गत जानेवारी ते मार्च  या कालावधीत झालेल्या सर्वेक्षणात लातूर विभागात औसा, मुरुड, जुना रेणापूर नाका आणि लामजना या चार बसस्थानकांनी उल्लेखनीय यश मिळवलं. अभियान पूर्ण झाल्यानंतर प्रत्येक गटात प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाच्या बसस्थानकांना रोख बक्षीस दिलं जाईल.

<><><><>

टपाल विभागानं पुढील पिढीच्या ए पी टी प्रणालीची अंमलबजावणी करण्याची घोषणा केली आहे. ए पी टी प्रणालीची रचना सुयोग्य अनुभव, वेगवान सेवा वितरण आणि वापरकर्त्यांसाठी अनुकूल करण्यात आली आहे. ही सुधारित प्रणाली दिल्लीच्या टपाल कार्यालयांमध्ये  येत्या सोमवारपासून अंमलात येणार आहे. ही प्रणाली कार्यरत करण्यासाठी दिल्लीमधल्या काही प्रमुख टपाल कार्यालयांमधलं कामकाज सोमवारी जनतेसाठी बंद राहणार असल्याची माहिती दूरसंचार मंत्रालयानं दिली आहे.

<><><><>

जळगाव जिल्ह्यातल्या धरणगाव इथं पद्मालय साठवण तलावासाठी जलसंपदा विभागानं १०७२ कोटी ४५ लाख रुपयांची सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे. जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी आकाशवाणी प्रतिनिधीला ही माहिती दिली आहे.

<><><><>

मुंबई विद्यापीठाच्या स्थापना दिनाचं औचित्य साधून युनिव्हर्सिटी डिपार्टमेंट रँकिंग फ्रेमवर्क पुरस्कार, प्रशासकीय गुणवत्ता अभियान आणि प्रशासकीय गुणवत्ता पुरस्कारांचं वितरण काल झालं. तसंच उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांचा सन्मानही यावेळी करण्यात आला. डॉक्टर होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू प्राध्यापक रजनीश कामत यांनी

वर्धापनदिन व्याख्यानमालेचं ११वं पुष्प गुंफलं. या कार्यक्रमात उपस्थितांशी संवाद साधताना मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्राध्यापक रवींद्र कुलकर्णी यांनी या विद्यापीठाच्या उत्कर्षासाठी, गौरवशाली आणि वैभवसंपन्न परंपरेसाठी, तसंच वैश्विक स्तरावर विद्यापीठाचं स्थान उंचावण्यासाठी सर्वांनी प्रयत्नशील राहण्याचं आवाहन केलं.

**<><><><>**

भारतीय महिला बुद्धिबळपटू कोनेरू हम्पी, हरिका द्रोणवल्ली, आर. वैशाली आणि दिव्या देशमुख यांनी FIDE जागतिक करंडकाच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. त्यामुळं भारत या स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत चार खेळाडू असलेला पहिला देश बनला आहे. आता भारत आणि चीन यांच्यात विजेतेपदासाठी चुरस आहे.

**<><><><>**

महिला क्रिकेटमधे इंग्लंड विरुद्ध भारत तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतला दुसरा सामना आज लंडनच्या लॉर्ड्स मैदानावर खेळला जाणार आहे. खेळ साडेतीन वाजता सुरु होईल.

**<><><><>**

येत्या चोवीस तासात कोकण आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. कोकण आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह जोरदार पाऊस पडेल तर राज्यात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यताही हवामान विभागानं वर्तवली आहे.

**//<><><><>//**